मानक: पथप्रदर्शक:

सत्यमेव जयते

भारतीय मानक ब्यूरो
उपभोक्ता मामले, खाद्य एवं सार्वजनिक वितरण मंत्रालय
भारत सरकार

BUREAU OF INDIAN STANDARDS
Ministry of Consumer Affairs, Food & Public Distribution
Government of India

09.12.2024

## प्रेस विज्ञप्ति

**बीआयएस स्टँडर्ड मार्कशिवाय दोन आणि तीन चाकी वाहनांसाठी व्हील रिम्स- शीट मेटल व्हील रिम्स उत्पादन करणाऱ्या, विक्रीसाठी साठवण आणी विक्री करणाऱ्या फर्मवर बीआयएस छापा**

भारतीय मानक ब्युरोच्या पुणे शाखा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने पुणे जिल्ह्यातील मेसर्स एसएम एंटरप्राइजेस, मेसर्स कॅप्रो एंटरप्रायझेस आणि मेसर्स सुमित प्रिसिजन फास्टनर्स प्रायव्हेट लिमिटेड या तीन ठिकाणी शोध आणि जप्ती केली. 29/11/2024 रोजी, मेसर्स एस.एम. एंटरप्राइजेस, गेट क्रमांक १५५६, पाटील नगर शेलार वस्ती, चिखली, 412114 हे बीआयएस मानक चिन्हाशिवाय दोन आणि तीन चाकी वाहनांसाठी व्हील रिम्स- शीट मेटल व्हील रिम्सचे उत्पादन आणि विक्री करताना आढळले. 30/11/2024 रोजी, मेसर्स कॅप्रो एंटरप्रायझेस, प्लॉट नं. J-178/1, J ब्लॉक, MIDC भोसरी, पुणे, 411026 हे बीआयएस मानक चिन्हाशिवाय कार्बन किंवा कार्बन-मॅगनीज स्टीलच्या गॅस शील्ड आणि सेल्फ शील्ड मेटल वेल्डिंगसाठी फ्लक्स कोर (ट्यूब्युलर) इलेक्ट्रोडची विक्री करताना आढळून आले. याशिवाय, मेसर्स सुमित प्रिसिजन फास्टनर्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर PAP G-73, चिखली रोड, MIDC चिंचवड, पुणे हे बीआयएस मानक मार्कशिवाय स्ट्रक्चरल स्टीलच्या गॅस शील्ड आर्क वेल्डिंगसाठी वेल्डिंग इलेक्ट्रोड विकताना आढळले. वरील तीन कंपन्यांनी गुणवत्ता नियंत्रण आदेशाचे उल्लंघन केल्याचे आढळले कारण कंपन्यांनी बीआयएस मानक चिन्हाशिवाय अनिवार्य प्रमाणनाखाली अधिसूचित उत्पादने विकल्याचे आढळले. पथकांनी मोठ्या प्रमाणात अशी उत्पादने जप्त केली आहेत.

ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड ॲक्ट, 2016 अंतर्गत गुन्हेगारांविरुद्ध बीआयएस पुणे शाखा कार्यालयाकडून कारवाई सुरू केली जात आहे. हा गुन्हा बीआयएस कायद्याच्या कलम 17 चे उल्लंघन आहे आणि त्याला 2 वर्षापर्यंत कारावास किंवा किमान 2 लाख रूपये दंड अशी शिक्षा आहे. प्रथम उल्लंघनासाठी BIS कायदा, 2016 च्या कलम 29(3) नुसार सक्षम न्यायालयात खटला चालवला जाईल.

अनेकवेळा असे आढळून आले आहे की अनिवार्य बीआयएस प्रमाणन अंतर्गत बीआयएस मानक चिन्हाशिवाय उत्पादने किंवा बनावट आयएसआय चिन्ह असलेली उत्पादने तयार केली जातात आणि मोठ्या नफ्यासाठी सामान्य ग्राहकांना विकली जातात. म्हणून, लोकांनी बीआयएस वेबसाइट http://www.bis.gov.in ला भेट देऊन किंवा BIS-केअर ॲपद्वारे खरेदी करण्यापूर्वी उत्पादनावर अनिवार्य BIS प्रमाणन आणि/किंवा ISI मार्कची वास्तविकता अनिवार्य करणारे गुणवत्ता नियंत्रण आदेश तपासले पाहिजेत. त्यामुळे सामान्य जनतेला विनंती करण्यात आली आहे की, खरेदी करण्यापूर्वी प्रत्येक वस्तूवर ISI चिन्ह तपासावे आणि कोणत्याही उत्पादनावर ISI मार्कचा गैरवापर किंवा गुणवत्ता नियंत्रण आदेशांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास, त्याची माहिती पुणे शाखा कार्यालय, भूखंड क्रमांक 657 ते 660, एमआयडीसी बिल्डिंग, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे येथे दिली जाऊ शकते. बी.आय.एस. कडे अशा तक्रारी complaints@bis.gov.in या पत्यावर ईमेलद्वारे, BIS CARE APP वर किंवा दूरध्वनी क्रमांक 02024268594 वर देखील केल्या जाऊ शकतात. अशा माहितीचा स्त्रोत गोपनीय ठेवला जाईल.

09/12/2024

एस. डी. राणे
वैज्ञानिक ई आणि प्रमुख
भारतीय मानक ब्यूरो पुणे

"For detailed information on BIS, consult the e-BIS portal (www.manakonline.in) / Please use BIS CARE APP for verification of ISI marked goods and hallmarked gold jewellery"